
# "Multidisciplinary Approach towards Indian Knowledge System"

## Recent Trends in
## Arts, Humanities, Management & Science

JANUARY 2023



Chief Editor

**Dr. S. R. Kattimani**

Publisher

**Siddharth Publications (M.S.)**

ISBN : 978-93-5980-212-1

# "Multidisciplinary Approach towards Indian Knowledge System"

Recent Trends in

**Arts, Humanities, Management & Science**

JANUARY 2023

Chief Editor

Dr. S. R. Kattimani

Publisher

**Sidharth Publications,(M.S.)**

ISBN : 978-93-5980-212-1

| | | | |
|---|---|---|---|
| 29. | Dr. Swapnil Buchde, Dr. D. K. Ghatge | संभाषण कौशल्य : स्वरूप व प्रकार | 197 |
| 30. | Dr. Swanil Buchde, Dr. Eknath Alwekar | साहित्य, समाज आणि संस्कृतीचा अनुबंध | 201 |
| 31. | Dr. Pradip Patil, Dr. Eknath Alwekar | साहित्य आणि समाज | 205 |
| 32. | Dr. Umesh D. Dabade, Dr. Sunny Kale | "Investment pattern of investors in Mutual Funds: A Case Study of Aditya Birla Sun Life" | 210 |
| 33. | Dr. D. V. Patil, Dr. G. S. Ubale | A Comprehensive Analysis of Urbanization's Geographic Patterns and Environmental Impacts | 217 |
| 34. | T.U. Urunkar1*, A. V. Shinde1, N. A. Narewadikar1, M.V.Takale2 | Effect of Self-focusing and Diffraction Length on Propagation of Gaussian Laser Beam in Non-Degenerate Germanium having Space Charge Neutrality. | 222 |
| 35. | Dr. Ekanath Alwekar, Dr. Pradip Patil | १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील बदलते वास्तव | 225 |
| 36. | Anjor Jadhav | Antimicrobial activity of aq. and alcoholic extract of Terminalia catappa L. drug resistant bacteria isolated from a clinical sample causing Urinary Tract Infection (UTI) | 229 |
| 37. | *Dr Sunil Bhosale **Dr Govardhan Ubale ***Dr. Sidharth Ghoderao | Hierarchical Distribution Of Towns In Kolhapur District | 250 |
| 38. | Dr. Siddharth S Ghoderao 1, Dr Subhash D Kamble 2 Dr. Govardhan S Ubale 3 Dr. Sunil G Bhosle 4 | Identification Of Land Use Land Cover And Change Detection Analysis Of Case Study Shirol Tehsil In Kolhapur District Using Gis And Remote Sensing Techniques | 255 |
| 39. | Ms. Sai Patil, Dr. Urmila Khot | भरडधान्य आरोग्यदायी अन्न | 258 |
| 40. | Mr. Sunny. S. Kale, Dr. Umesh Dabade | Tax Planning Analysis: Overview | 262 |
| 41. | Dr. S. R. Kattimani | कोरोना नंतरच्या शेअर माकेटमधील आर्थिक गुंतवणूकीबाबतचे विचारमंथन | 267 |
| 42. | Mr. H. V. Chame | जाती संस्थेतील परिवततन एक समाजशास्त्रीय अभ्यास | 272 |

# १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील बदलते वास्तव

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. प्रदीप पाटील**

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

---

- **प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्य प्रवाह १९६० नंतरच्या कालखंडातील महत्त्वाचा साहित्य प्रवाह आहे .या साहित्य प्रवाहात कथा,कादंबरी या वाङ्.मय प्रकारात बरेचसे साहित्य लिहिले गेले. ग्रामीण जीवनातील विविध घटक,तिथला निसर्ग, शेती, बोलीभाषा, तिथले सामाजिक सांस्कृतिक जीवन यांचे प्रतिबिंब या साहित्यामधून उमटू लागले.थोडक्यात, ग्रामीण संवेदनशीलतेचे चित्रण या साहित्य प्रवाहातून आले आहेत .

- **उद्दिष्ट्ये :**

१. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीची ओळख करून देणे.

२. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील चित्रित झालेले वास्तव जाणून घेणे.

३. खेड्यातील बदलता समाज, बदलती संस्कृती समजावून घेणे.

४. ग्रामीण साहित्यातून येणाऱ्या नव्या प्रश्नांची, समस्यांची ओळख करून घेणे.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

- **ग्रामीण मराठी कादंबरीची वाटचाल :**

पिराजी पाटील (१९०३) ही रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची पहिली ग्रामीण मराठी कादंबरी. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात र. वा. दिघे, बा. सी. मर्ढेकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांचे कादंबरी लेखन महत्त्वपूर्ण मानावे लागते. बा. सी. मर्ढेकर वगळता बाकीच्या कादंबरीकारानी मराठीच्या मुख्य कादंबरी प्रवाहाच्या अनुकरणाचाच कित्ता गिरविला. सौंदर्यवादाचा प्रभाव या कालखंडातील कादंबरी लेखनावर आढळतो. पुढे स्वातंत्र्योत्तर  कालखंडात या दृष्टिकोनात हळूहळू बदल होत गेला. व्यंकटेश माडगूळकर, ग.ल.ठोकळ यांचे कादंबरी लेखन महत्त्वाचे ठरले.पुढील कालखंडात १९६०ते १९८० व १९८० नंतरची कादंबरी असे दोन टप्पे पडतात.पहिल्या टप्प्यात उद्धव शेळके, आनंद यादव, रा.रं. बोराडे इत्यादी लेखकांचा समावेश होतो. १९८० नंतरच्या टप्प्यात रंगनाथ पठारे, राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख, मोहन पाटील, कृष्णात खोत, द. तु. पाटील इत्यादींचा समावेश होतो. आत्मभान या  आलेल्या लेखकानी आजचे वर्तमान वास्तव आपल्या लेखनातून टिपले आहे.

- **बदलत्या ग्रामीण वास्तवाचे स्वरूप:**

आजचे ग्रामीण साहित्य हे नव्या संवेदनशील सर्जनशील मनाचा आविष्कार आहे.आज ग्रामीण भागात परिवर्तन घडले आहे. त्याचबरोबर नवे प्रश्न, नव्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. आजच्या ग्रामीण लेखकांना हे प्रश्न भेडसावतात व त्यातून नवे प्रश्न मांडणाऱ्या कलाकृती निर्माण होताना दिसतात. आजच्या ग्रामीण साहित्यिकांच्या लेखनाबद्दल वासुदेव मुलाटे  म्हणतात,

'नित्याच्या सरळमार्गी जीवन जगू इच्छिणाऱ्या माणसांच्या मनाचा कोंडमारा, येणारे गुदमरलेपण,जाणवणारी दाहकता, परिस्थितीच्या वणव्यात होरपळून निघणारे माणसांचे आक्रोश, आतले आवाज ,स्फुंदणारे अंतर्गत मन, दाटून येणारे हुंदके, उसाचे आणि निश्वास आजच्या ग्रामीण साहित्याच्या लेखणीचे विषय आहेत.

- **ग्रामीण कादंबरीतील अपेक्षित चित्रण:**

बदलत्या ग्रामीण वास्तवामध्ये अनेक गोष्टी येतात. प्रसार माध्यमाचा ग्रामीण जनमानसावर झालेला प्रभाव विशेषत: दूरचित्रवाणीचा प्रभाव, केबल संस्कृतीचे आक्रमण, सभासमारंभाना आलेला पूर ,जाहिरात संस्कृतीचे अतिक्रमण, गावच्या प्रवेशद्वारावरील कमानी, फ्लेक्सबोर्ड इत्यादी तसेच शेतीची होत चाललेली भयानक अवस्था ,वृक्ष संवर्धनाविषयी बेफिकिरी, खोट्या साक्षी देणे, खोटी प्रकरणे तयार करणे , सर्व काही सरकारने करावे ही भूमिका सातत्याने घेण्याची वृत्ती, सहकाराला लागलेली घरघर, शहराकडे स्थलांतर, दूरचित्रवाणी संस्कृतीतील कुसंस्काराचे होणारे अनुकरण, वृद्धांचे होणारी दयनीय अवस्था ,ग्रामपंचायत ते लोकसभा सर्वत्र घोषणाबाजीला आलेले महत्त्व, गावातील संघर्षाचे प्रसंग, व्यसनांचा सुकाळ , मटका, गुटखा, गावठी दारू इत्यादीचा समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम ,मनोरुग्णांची वाढती संख्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, धरणग्रस्तांचे न सुटणारे प्रश्न इत्यादीमुळे ग्रामीण वास्तव कमालीचे तणावपूर्ण ,नाट्यमय दुःखद व विषण्ण झालेले दिसते. याचे वेधक चित्रण ग्रामीण कादंबरीत अपेक्षित आहे.

- **१९९० नंतरच्या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतील वास्तव चित्रण:**

१९९० नंतरच्या कालखंडातील आनंद यादव(गोतावळा),विश्वास पाटील(पांगिरा), राजन गवस(तणकट), सदानंद देशमुख(तहान, बारोमास), कृष्णात खोत (गावठाण, रौंदाळा), मोहन पाटील (लिगाड व खांदेपालट), द. तु. पाटील (चैत) असे काही ग्रामीण कादंबरीचे टप्पे पाडता येतील. वरील कालखंडात ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना संदर्भ बदलत केल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनामध्ये होणारे स्थित्यंतर या कादंबऱ्यातून चित्रित होऊ लागले. ग्रामीण जीवनातील शेती, सामाजिक, सांस्कृतिक जीवन, तिथले आधुनिक प्रश्न, जागतिकीकरणाचा ग्रामीण जनमानसावर झालेल्या परीणाम, निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, बदलत चाललेली भाषा, शहराचा वाढता प्रभाव यातून ग्रामीण वास्तव चित्रण विविध प्रकारे शब्दांकित झाले.

१९९० नंतरच्या कालखंडात ग्रामीण समाजमन ढवळून निघाले आहे. शिक्षण, सण, उत्सव, संस्कृती या सगळ्या गोष्टी बदलत गेल्या. त्याचप्रमाणे बुवाबाजी दिखाऊ धार्मिकता यांना आलेली चलती पाहावयास मिळते. आचार विचारातून स्पष्ट होणा-या विसंगतीचे दर्शन होते. देवळे बांधणे, जत्रा , ऊरुस, सप्ताह, मोठ्यांचे लग्न समारंभ, सत्कार समारंभ, वाढदिवसानिमित्त किंवा एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगानिमित्त होणाऱ्या नृत्य स्पर्धा इत्यादीतून होणारे बाजरी मूल्यांचे दर्शन घडते. दूरचित्रवाणी, मोटरसायकली मोटारी यांची सुबत्ता आढळते पण शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, गरिबांचा उद्धार, ग्रंथालयांची उभारणी याबाबतीतील उदासीनता व त्यातून सांस्कृतिक जीवनाचा होणारा -हास यांचेच दर्शन या कालखंडात होताना आढळते.

या प्रश्नापैकी बरेचसे प्रश्न १९९० नंतरच्या कादंबऱ्यातून आलेले आहेत. रंगनाथ पठारे, राजन गवस, विश्वास पाटील यांचे कादंबरीलेखन पूर्वीच्या कादंबऱ्यापेक्षा वेगळे झाल्याचे दिसते. प्रस्तुत लेखांमध्ये ग्रामीण कादंबरीतील बदलते वास्तव प्रातिनिधीक कादंबऱ्यांच्या आधारे मांडले आहे.

राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीमध्ये बदललेल्या ग्रामव्यवस्थेचे चित्रण येते. कादंबरीमध्ये बाळासाहेब शेडबाळे भ्रष्टाचार करतो. खेड्यातील जातीव्यवस्था, सध्याच्या दूरचित्रवाणीवरील मालिकातून स्त्री-पुरुषातील अनैतिकतेचे होणारे दर्शन याचे प्रतिबिंब या कादंबरीत असून संसारी स्त्री पुरुषातील विवाहबाह्य संबंधाचे चित्रण यात येते.

खेड्यात सुद्धा मानवतेला लागलेला सुरुंग खेड्याचे होणारे विकृतीकरण. खेड्याचे झालेले दृश्य अदृश्य स्वरूपातील शहरीकरण, दलित तरुणांचे वेगवेगळ्या संघटना बांधणे आणि वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळवणे. 'संघटित व्हा' चा मूळ हेतू बाजूला पडल्याचेच चित्रण येते.

सदानंद देशमुख यांच्या 'तहान' आणि 'बारोमास' मधून बदलत्या ग्रामजीवनातील अनेक संदर्भ आले आहेत. खेड्याचे बदलते रूप दाखविताना 'तहान' मध्ये सारंगपूरचे जुनं गाव आणि नवगाव असे दोन भाग केले आहेत. नव्या गावात स्टेट बँकेची शाखा, पुढे त्या मार्गावर पेट्रोल पंप ,हॉटेल,धाबे,पानपट्ट्या गावात वर्तमानपत्र,टीव्ही, रेडिओ इत्यादी माध्यमातून देश परदेशातल्या बातम्या कळतात. तरुण पिढी नव्या व्यवसायात आहे. वर्तमानपत्राची एजन्सी घेणे, एसटीडी बूथ चालवणे याचे दर्शन घडते. दोन पिढ्यातील संघर्षात झालेली वाढ बबन शेवाळे आणि राघोजी शेवाळे यांच्या संवादातून जाणवते.

'बारोमास' मधून शेती असूनही शेतकरी कुटुंबांना जगण्यासाठी यातायात कशी करावी लागते? याचे चित्रण आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण या पार्श्वभूमीवर महत्वपूर्ण ठरते. शेतकऱ्यांच्या नव्या पिढीचे चित्रण करताना कादंबरीतील एकनाथ शिक्षण, नोकरी- व्यवसाय या चक्रात अडकलेला आहे. शेतकऱ्यांची नवी पिढी शेती सोडून उच्च शिक्षण घेताना आढळते. पण शेतीपासून ती पिढी दूर जात आहे. शेतीकडे धंदा म्हणून पाहण्यास ही पिढी नकार देत. यातील मधु शेती करण्यापेक्षा मित्रांच्या संगतीने झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग शोधतो. पारंपरिक व्यवसायाने ग्रामीण संस्कृतीपासून पूर्णपणे फारकत घेतलेली आढळते. नव्या तरुण पिढीला शहरीकरणाचे आकर्षण मधू आणि अलकाच्या रूपाने पाहावयास मिळते. शेतकऱ्यांच्या मुली, सुना शहरात राहण्याचे स्वप्न बघतात.

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षात आपल्या कादंबरी लेखनाला प्रारंभ केलेले कोल्हापूर परिसरातले ग्रामीण कादंबरीकार कृष्णात खोत यांनी 'गावठाण' आणि 'रौंदाळा', 'झड-झिंबड', 'धूळमाती', 'रिंगाण' या कादंब-या लिहिल्या आहेत. 'गावठाण' मध्ये ग्रामीण परिसरातील पारंपरिक वर्णन असले तरी काही प्रसंग मात्र बदलत्या वास्तवाबद्दल सांगतात. आतापर्यंत शेतकरी गाई, म्हैशींना गाभण घालवण्यासाठी पाडा, रेडा यांचा वापर करीत पण 'गावठाण' मधील त्या डोंगरातील खेड्यात सुद्धा आता ढोरावरचा डॉक्टर येतो. आणि इंजेक्शन देऊन ढोराला गाभ घालवतो याचे चित्र येते.

कृष्णात खोतांच्या कादंबऱ्यातील बदललेल्या ग्रामीण वास्तवाबद्दल रंगनाथ पठारे म्हणतात,' ''गावठाण'मध्ये जे नाही ते सारं 'रौंदाळा' मध्ये आहे. 'गावठाण' मधल्या बारक्या गावातले शेतकरी एकमेकांना धरून राहणारे एकमेकांच्या अडीनडीला उभं राहणारे आहेत. शेतकरी सुद्धा एकमेकांच्या सुखदुःखात अंतकरणापासून सहभागी होताना दिसतो. याउलट 'रौंदाळा'मध्ये गावठाणाचाच रौंदाळा झाल्याचं आपल्याला दिसतं. गावठाणमधलंच पुढचं बदलेल राजकारणग्रस्त गाव आपल्याला या दुसऱ्या कादंबरी दिसतं.''.

'रौंदाळा'मध्ये मात्र बदललेला कालखंड बऱ्याच प्रसंगातून वाचकांसमोर उभा केला आहे. राजकारणग्रस्त गाव असंच या गावचं वर्णन करता येईल. कारण प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या निमित्ताने राजकारणाच्या जंजाळात सापडतो. तिथे घराघरात

राजकारण शिरलेले दिसते. तरुणपिढी अधिक सक्रिय होताना आढळते. ग्रामपंचायत, बँक, सोसायटी निवडणूक यात लोक उत्साहाने भाग घेऊन डाव प्रतिडाव खेळतात. एका पुढाऱ्यांची सोसायटी म्हटल्यावर दुसरा पुढारी लगेच सोसायटी काढतो. गाव तसं लहान पण सोसायटी संस्था मात्र दोन-दोन, तीन- तीन असे चित्र आज ग्रामीण भागात आढळते. या घाणेरड्या स्वार्थी राजकारणामुळे खेळण्यात सुद्धा माणुसकी हरवत चालली की काय? असा प्रश्न निर्माण होतो.

'धूळमाती' या कादंबरीमध्ये खेड्यात शब्दाला मान असतो पण काळ बदलला तसा शब्दावरचा विश्वास संपत चालला याबद्दलचा प्रसंग कुळ आणि जमीन मालक यांच्यामधील कादंबरीकाराने रेखाटला आहे. एकमेकाबद्दलच्या उपकाराची जाण न ठेवणे, अविश्वास दाखवणे, हव्याशी वृत्तीमुळे जवळची नाती तोडणे त्यामुळे संवेदनशील माणसाला होणारा त्रास दादाच्या निमित्ताने कादंबरीत चित्रित झाला आहे.

'चैत' या कादंबरीमध्ये गावचा चैत साजरा करताना त्यावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडल्याचे जाणवते. पूर्वी चैताला पायी येणारी माणसं आता मोटरसायकल, कार घेऊन येतात. जत्रेत जाहिरातींचे डिजिटल बोर्ड पाहायला मिळतात. जत्रेच्या निमित्ताने तरुणांच्यातील वाढलेल्या व्यसनाधीनतेचे चित्रण येते . कादंबरीतील जनकच्या म्हणण्याप्रमाणे जुन्या काळात चैत ठिक होता पण आता तो काळ राहिलेला नव्हता.

- **निष्कर्ष :**

आजचा ग्रामीण लेखक बदलत्या वास्तवाचा वेध घेताना अनेक नवनवीन प्रश्न मांडत आहे. खेड आणि शहर यांच्यातील अंतर हळूहळू कमी होताना त्याचा परिणाम सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर, भाषेवर, राहणीमानावर, मानसिकतेवर कसा होतो ह्याचे भान हे कादंबरीकार आणून देतात.

- **संदर्भ :**

१. मुलाटे वासुदेव : साहित्य, समाज आणि परिवर्तन, पृष्ठ क्र. ४८
२. पठारे रंगनाथ : परिवर्तनाचा वाटसरू, (१६ जुलै ते ३१ जुलै, २००९) पृष्ठ क्र. २१